* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

दि.०२/०१/२०१९

---

## *जिल्हा पोलीस अधिक्षक मोक्षदा पाटील यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेची अवैध जुगाराविरुध्द धडक कार्यवाही २,०६,८००/- रु चा माल हस्तगत.*

पोलीस स्टेशन रिसोड अंर्तगत ग्राम वाकद ते मेहकर रोडवरील बालखेडा शिवारात एका टिनशेड मध्ये पैशाची बाजी लावुन हारजितचा जुगार खेळ सुरु असल्याची माहीती मा. जिल्हा पोलीस अधिक्षक मोक्षदा पाटील यांना मिळाल्यावरुन त्यांना सदर ठिकाणी छापा मारुन कायदेशीर कार्यवाही करण्याचे आदेश पोलीस निरिक्षक शिवाजी ठाकरे स्थानिक गुन्हे शाखा यांना दिले.

शिवा ठाकरे यांनी मिळालेल्या माहितीची शहानिशा करुन दिनांक ०१/०१/२०१९ रोजी १५.३० वा ग्राम वाकद ते मेहकर रोडवरील बालखेडा शिवारात एका टिनशेड मध्ये चालणाऱ्या जुगाराचे ठिकाणी छापा घालुन जुगार खेळणारे एकुण ३० लोकांना एक ते दहा आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजितचा जुगार खेळ खेळत असतांना मोक्यावर पकडून त्यांचे कडुन नगदी रक्कम ***१,५९,८००/-*** रू,व मोबाईल ४७३००/- रु चे जुगार खेळण्यासाठी उपयोगात येणारे साहित्य असा एकुण ***०२,०६,८००/-रु*** असा मुददेमाल जप्त केला. सदर प्रकरणी पोउपनिरी भगवान पायघन,यांचे फिर्याद वरुन पोलीस स्टेशन रिसोड येथे कलम १२(अ) जुगार ॲक्ट प्रमाणे एकुण ३१ आरोपी विरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला.

सदरहु कार्यवाही पो.नि.श्री शिवा ठाकरे, यांचे मार्गदर्शनाखाली सपोनी अतुल मोहनकर पोउपनिरी भगवान पायघन,सपोउपनि भगवान गावंडे,नापोकॉ किशोर चिंचोळकर , प्रशांत राजगुरु,संतोष शेणकुडे,राम नागुलकर मपोकॉ रेशमा ठाकरे चालक नापोकॉ मिलींद गायकवाड यांनी केली. जिल्हयात कोणाची अवैध धंदया विरुध्द तक्रार असल्यास अथवा अवैध धंदयाची माहिती असल्यास पोलीस निरीक्षक शिवा ठाकरे स्थानिक गुन्हे शाखा, वाशीम यांचेशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

पोलीस निरीक्षक,
स्थानिक गुन्हे शाखा वाशिम